# महाराष्ट्र विधानसभा

**दुसरे अधिवेशन, २०२४**
**सन २०२३-२४ च्या पुरवणी मागण्यांवरील**
**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**
**मंगळवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२४**

## महसूल व वन विभाग

**कपात सूचनांची एकूण संख्या - १०**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-५**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण**<br>**बाब क्रमांक: ३०, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. विनोद निकोले** |
| (१) | ६२४२ | १० | कोयना भूकंप पुनर्वसन निधी समितीसाठी नव्याने लेखाशीर्ष कार्यान्वित करण्याकरीता रुपये 1000 ची तरतूद करण्याचे ठरविण्यात आले आहे. परंतु, तारापूर एमआयडीसी क्षेत्रातही वारंवार भूकंप होत असून येतेही कोयना भूकंप पुनर्वसन निधी समिती प्रमाणेच याच लेखाशीर्ष अंतर्गत निधी देऊन तारापूर एमआयडीसी क्षेत्रातील जनतेचे भूकंप पुनर्वसन करण्यात यावे यासाठी 25 कोटी निधी देऊन येथे उक्त समिती सुरु करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-६**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २२४५, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य**<br>**बाब क्रमांक: ३१, रूपये:- १६,६२,०१,८९,०००/-**<br>**श्री. राजेश एकडे** |
| (२) | ६२७९ | १० | बुलढाणा जिल्हयातील स्थानिक लोकप्रतिनिधींच्या मतदार संघातील कोदरखेड, बेलाड, जुनी येरळी, नवी येरळी, दादगांव, रोटी, भोटा, हिंगणा, इसापुर, हिंगणा अवचार, निमगांव या गावांमध्ये २६ फेब्रुवारी २०२४ रोजी सायंकाळी अवकाळी पाऊस व गारपीट झाल्यामुळे शेतकऱ्यांचा हरभरा,गहु, मका इत्यादी रब्बी पीकांचे अतोनात नुकसान झाल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे त्यामुळे त्यांचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना ताबडतोब नुकसान भरपाई देण्यात यावी |
| | | | **श्री. राजेश टोपे** |
| (३) | ६२३९ | १० | जालना जिल्हयातील घनसावंगी मतदार संघामधील नोव्हेंबर व डिसेंबर 2023 या कालावधीत अवकाळी पाऊस, गारपीट व वादळी वारे  यामुळे बाधित झालेल्या शेतीपिक, फळपिकांच्या नुकसानभरपाई बाबत. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **श्री. विनोद निकोले** |
| (४) | ६२४३ | १० | नोव्हेंबर व डिसेंबर 2023 या कालावधीत अवकाळी पाऊस गारपीट व वादळी वारे यामुळे बाधित शेत पिके फळ पिकांच्या नुकसान भरपाई वरील खर्च भागवण्यासाठी रुपये 22102973000 इतक्या अतिरिक्त निधीची तरतूद करण्याची ठरविण्यात आले त्यापैकी रुपये 54,82,78,4000/- इतका खर्च चालू किती वर्षाच्या मंजूर अनुदानातून भागवणे शक्य असल्याने रुपये 16,62,01,89,000/- इतक्या रकमेची पूरक मागणी प्रस्तावित केली आहे. मात्र माझ्या पालघर जिल्ह्यातील डहाणू तालुक्यातील चिक्कू, जांभळ, व इतर फळबागांच्या झालेल्या नुकसान भरपाईचा यात समावेश करून येथील शेतकऱ्यांना हेक्टरी 01 लक्ष रुपये अनुदान यासाठी निधीची तरतूद करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (५) | ६२७३ | १० | अकोला जिल्ह्यातील अकोट विधानसभा मतदारसंघातील अवकाळी पावसामुळे झालेल्या पानपिंप्री पिकांचे नुकसानीबाबत आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी स्थानिक शेतकरी, लोकप्रतिनिधी यांनी माहे डिसेंबर, २०२३ मध्ये वा त्या दरम्यान शासनाकडे केलेली असणे, अकोट येथे पानप्रिंप्री या औषधी गुणधर्म असलेल्या पिकांची मोठया प्रमाणावर लागवड करण्यात आली असणे, हे पिक अत्यंत नाजूक असल्याने लागवड करण्यात आलेल्या पिकांचे व तोडणी झालेल्या पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले असणे, अकोट विधानसभा मतदारसंघात अंदाजे ५०० हेक्टर पर्यंत या पिकांची लागवड करण्यात येत असून अवकाळी पावसामुळे १०० टक्के पिकांचे नुकसान झालेले असणे, तसेच पानप्रिंप्री ही वनौषधी असल्याने पिक विम्यामध्ये समाविष्ट नसणे, अकोला जिल्ह्यात बारी समाजाची लोकसंख्या मोठया प्रमाणांत असून ते अल्पभूधारक असून त्यांच्याकडून या वनौषधी पिकांची लागवड करण्यात करण्यात येत असल्याने अवकाळी पावसामुळे पिकांचे झालेल्या नुकसानीमुळे या समाजातील लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाल्यामुळे या शेतकऱ्यांना तातडीने 1 लाख रुपये एकरी नुकसानभरपाई देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी, स्थानिक शेतकरी यांनी शासनाकडे केलेली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (६) | ६२७४ | १० | महाड तालुक्यातील (जि. रायगड) येथे माहे जुलै २०२३ मध्ये अतिवृष्टीमुळे ४४ गावे बाधित झाले असून ७९९ शेतकरी लाभापासून वंचित असल्याचे निदर्शनास येणे तसेच माहे ऑक्टोबर २०२३ मध्ये झालेल्या अवेळी पावसामुळे १५१ गावांतील शेतकऱ्यांचे भात शेतीचे नुकसान झाले असून एकूण ५२३.८७ हेक्टर शेतीचे नुकसान झालेले असणे, महाड तालुक्यातील भात शेतीतील नुकसानग्रस्त अद्यापू शेतकऱ्यांना भरपाई जाहिर करुनही अद्यापी नुकसान भरपाई न दिल्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडलेला असणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष झाल्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (७) | ६२७६ | १० | दिनांक ८ फेब्रुवारी २०२४ रोजी अवकाळी पावसामुळे कोकणातील आंबा पिकांचे प्रचंड नुकसान झालेले असणे तसेच दि. १० ते १२ फेब्रुवारी २०२४ मध्ये झालेल्या गारपीट, अवकाळी पावसामुळे विदर्भातील चंद्रपूर, वर्धा, यवतमाळ, अमरावती, भंडारा व गोंदिया येथील सुमारे ३८ हजार हेक्टरवरील गहू, हरभरा, कापूस, संत्रा, मोसंबी तसेच रब्बी सोयाबीन पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास येणे, अवकाळी पाऊस, गारपिटीने विदर्भातील नुकसानग्रस्त जिल्ह्यातील गहू, हरभरा, तूर, संत्रा, मोसंबी, कापूस, सोयाबीन पिकांचे तसेच कोकणातील आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे आंबा उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान होऊनही शेतकऱ्यांना अद्यापही नुकसान भरपाई मिळालेली नसणे, तसेच दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी चंद्रपूर, वर्धा, बुलढाणा, नाशिक, जळगांव, हिंगोली, जालना, संभाजीनगर येथे झालेल्या गारपिटीसह अवकाळी पावसामुळे चणा, गहू,हरभरा, मिरची, कापूस, द्राक्ष, संत्रा या पिकांचे मोठया प्रमाणावर नुकसान झालेले असणे, याबाबत तातडीने शासनाकडून पंचनामे करुन नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई करणे आवश्यक असणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **पूरक मागणी क्रमांक: सी-७**<br>**मुख्य लेखाशीर्ष: २४०६, वनीकरण व वन्यजीवन**<br>**बाब क्रमांक: ३२, रूपये:- १,०००/-**<br>**श्री. विजय वडेट्टीवार** |
| (८) | ६२७० | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत चिचपल्ली अंतर्गत मौजा चिचपल्ली या गावात लगत जंगल असल्यामुळे तेथील ग्रामस्थांच्या शेतात रान डुक्कर, चितर, सांभर, वाघ व अन्य जनावरे घूसून मोठया प्रमाणात पिकांचे नुकसान करीत असणे, तसेच जंगलातील वाघ व अन्य हिंस्र प्राणी पाळीव जनावरांची देखील शिकार करीत असल्याने शेतकऱ्यांना शेताला तार कुंपण, सौर ऊर्जा करंट मशिन बसविण्याकरिता तात्काळ आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये मा. वने मंत्री लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, तरी चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत चिचपल्ली अंतर्गत मौजा चिचपल्ली व जांभार्ला येथील गावातील शेतकऱ्यांना शेतकऱ्यांना शेताला तार कुंपण, सौर ऊर्जा करंट मशिन बसविण्याकरिता तसेच हिंस्त्र जनावरांच्या हल्ला केलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची आवश्यकता असणे, या गावातील अनेक नागरिकांवर हिंस्त्र जनावरांकडून हल्ले करण्यात आले असून गावातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले असणे व यावर तातडीने प्रतिबंध करण्याकरिता शासनामार्फत उपाययोजना करणे आवश्यक असणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असल्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| (९) | ६२७७ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत ताडाळा या गावात लगत जंगल असल्यामुळे तेथील ग्रामस्थांच्या शेतात रान डुक्कर, चितर, सांभर, वाघ व अन्य जनावरे घूसून मोठया प्रमाणात पिकांचे नुकसान करीत असणे, तसेच जंगलातील वाघ व अन्य हिंस्र प्राणी पाळीव जनावरांची देखील शिकार करीत असल्याने शेतकऱ्यांना शेताला तार कुंपण, सौर ऊर्जा करंट मशिन बसविण्याकरिता तात्काळ आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये मा. वने मंत्री लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, तरी चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत ताडाळा येथील गावातील शेतकऱ्यांना शेतकऱ्यांना शेताला तार कुंपण, सौर ऊर्जा करंट मशिन बसविण्याकरिता तसेच हिंस्त्र जनावरांच्या हल्ला केलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची आवश्यकता असणे, या गावातील अनेक नागरिकांवर हिंस्त्र जनावरांकडून हल्ले करण्यात आले असून गावातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले असणे व यावर तातडीने प्रतिबंध करण्याकरिता शासनामार्फत उपाययोजना करणे आवश्यक असणे,याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |
| (१०) | ६२७८ | १० | चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत टोलेवाही येथील गावे जंगलाच्या जवळ असल्याने जंगलातील वाघ व हिंस्त्र प्राणी गावकऱ्यांवर हल्ले करीत असल्याने वाघाने हल्ला केलेल्या व्यक्तीच्या कुटुंबियांना ५० लक्ष रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबतची मागणी लोकप्रतिनिधी यांनी माहे नोव्हेंबर २०२३ मध्ये मा. वने मंत्री लेखी निवेदनाव्दारे केलेली असणे, तरी चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामपंचायत टोलेवाही येथील गावातील शेतकऱ्यांना शेतकऱ्यांना शेताला तार कुंपण, सौर ऊर्जा करंट मशिन बसविण्याकरिता तसेच हिंस्त्र जनावरांच्या हल्ला केलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना तात्काळ आर्थिक मदत देण्याची आवश्यकता असणे,टोलेवाही या गावातील अनेक नागरिकांवर हिंस्त्र जनावरांकडून हल्ले करण्यात आले असून गावातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण पसरलेले असणे व यावर तातडीने प्रतिबंध करण्याकरिता शासनामार्फत उपाययोजना करणे आवश्यक असणे, याकडे शासनाचे दुर्लक्ष झाले असल्यामुळे शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : २७ फेब्रुवारी, २०२४**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) महसूल व वन विभाग (१० प्रती)
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई